11/11/2022

## सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची पात्रता परीक्षा (सेट) २६ मार्च रोजी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू

पुणे, दि.१०- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणारी महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) २६ मार्च रोजी घेण्यात आहे. यासाठीची अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थी ३० नोव्हेंबर पर्यंत यासाठी अर्ज करू शकतात.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या यांच्या मान्यतेने राज्य शासनाच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सेट विभागातर्फे महाराष्ट्र व गोवा राज्यातील उमेदवारांसाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) आयोजित करण्यात येते. यंदाची ३८ वी परीक्षा ही २६ मार्च २०२३ रोजी घेण्यात येणार असून यासाठीची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबतची माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव तथा सेटचे सदस्य सचिव डॉ.प्रफुल्ल पवार यांनी सांगितले.

यासाठी उमेदवारांनी १० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत https://setexam.unipune.ac.in या संकेस्थळावर अर्ज करावा. तर विलंब शुल्कासहित अर्ज करण्याची मुदत १ डिसेंबर ते ७ डिसेंबर अशी असणार आहे.

परीक्षेबाबतच्या अधिक माहितीसाठी संकेस्थळाला भेट द्यावी असे आवाहन सेट विभागातर्फे करण्यात आले आहे.

-----

# State Eligibility Test (SET) for the post of Assistant Professor on 26th March Online application process started

Pune, 10th Nov- The Maharashtra State Level Eligibility Test (SET) for the post of Assistant Professor has been conducted on March 26. The application process for this has started and students can apply till 30th November.

Dr. Prafulla Pawar, Registrar of Savitribai Phule Pune University and Member Secretary of SET said, State Level Eligibility Test (SET) is conducted by Savitribai Phule Pune University, SET Department on behalf of the State Government with the approval of the University Grants Commission for candidates from Maharashtra and Goa. The 38th examination of this year will be conducted on 26 March 2023 and the online application process has been started.

For this, candidates should apply on the website https://setexam.unipune.ac.in from 10th to 30th November 2022. The deadline for applying with late fees will be from 1st December to 7th December 2022.

For more information about the exam, you are requested to visit the website.

-----